संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
(नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)

जनसंपर्क विभाग

---

## विद्यार्थी, शिक्षक, कर्मचारी व पालक यांना
## विद्यापीठाच्या उन्हाळी २०२० परीक्षांबाबत महत्वाची सूचना
### विद्यार्थ्यांनी अभ्यासाकडे लक्ष द्यावे - कुलगुरू

अमरावती.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या उन्हाळी २०२० च्या सर्व बॅकलॉग (ऑड सेमिस्टर) परीक्षा (बी.एस्सी. व अभियांत्रिकी सोडून) १५ एप्रिल पासून, सर्व नियमित (इव्हन सेमिस्टर) परीक्षा (बी.एस्सी. व अभियांत्रिकी सोडून) ९ मे पासून, सर्व बी.एस्सी. च्या बॅकलॉग परीक्षा ९ मे पासून, सर्व अभियांत्रिकीच्या बॅकलॉग परीक्षा २६ मे पासून, बी.एस्सी. व अभियांत्रिकीच्या सर्व नियमित परीक्षा १५ एप्रिल पासून सुरु होणार आहेत.

प्रात्याक्षिक परीक्षा या दि. १ ते १५ जून, २०२० यादरम्यान होतील. परीक्षेसंबंधी काही अडचण असल्यास हेल्पलाईन क्रमांक ०७२१-२६६८११४ आणि टोल फ्री क्रमांक १८००-२३३-६५५४ यावर स. ११.०० ते सायं. ६.०० यादरम्यान संपर्क साधता येईल. याशिवाय directorboee@sgbau.ac.in यावर ई-मेल पाठवून शंका निरसन करण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.

विद्यापीठ संकेतस्थळाच्या होमपेजवर 'कोरोना ईम्पॅक्ट इम्पॉर्टन्ट नोटीसेस अॅन्ड सर्क्युलर' या टॅबवर परीक्षा तसेच कोव्हिड-१९ (नोबल कोरोना व्हायरस) यासंबंधी वेळोवेळी माहिती उपलब्ध केल्या जाईल.

विद्यापीठ विद्यार्थ्यांची सर्वतोपरी काळजी घेत असून विद्यार्थी, शिक्षक, पालक, कर्मचारी व सर्व संबंधितांनी संयम पाळावा, काळजी घ्यावी, चिंता करु नये, असे आवाहन कुलगुरू डॉ. मुरलीधर चांदेकर यांनी केले आहे. कोरोना व्हायरस प्रार्दुभाव रोखण्याकरीता परीक्षेमध्ये परिस्थितीनुरुप बदल होवू शकतो, याची सर्वांनी नोंद घ्यावी.

---

प्रति,
मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी
दै............................... अमरावती.

**जनसंपर्क विभाग**
दि. २१/०३/२०२०.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी